# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**सातारा जिल्ह्यातील कोयना धरण जलविद्युत प्रकल्पाबाबत**

**(१) ७६४९ (०७-०४-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील कोयना धरण जलविद्युत प्रकल्पासाठी ९८ मूळ वसाहती व १२५ वाड्यातील जमीन व घरे सन १९५४ ते १९६४ या दरम्यान संपादित करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमीन संपादित करताना विस्थापित शेतक-यांना महाराष्ट्रात जेथे वसाहत कराल तेथे जमीन व नागरिसुविधा पुरविण्यात येतील असे आश्वासन शासनाकडून देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्ह्यातील खालापूर, पनवेल, पेण व माणगाव भागात कोयना प्रकलपग्रस्तांच्या सुमारे ४५ वसाहती असून अद्याप या ठिकाणी शासनाकडून देण्यात आलेल्या आश्वासनानुसार १८ सुविधांपैकी केवळ १० सुविधा देखील गेल्या ५५ वर्षात पुरविण्यात आल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाकडून तातडीने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०३-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) शासकीय अभिलेखात काही आढळून येत नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यात काळेश्री, काचळी, नवखार व मोरापाडा येथे मच्छिमार जेट्टी बांधणेबाबत**

**(२) ७७०१ (०७-०५-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे काळेश्री (ता.पेण) व काचळी, नवखार, मोरापाडा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे स्थानिक लोकप्रतिनिधींनी मच्छी उतरविण्यासाठी जेट्टी बांधून मिळणेबाबत महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त जेट्टी बांधकामास महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड यांच्याकडून मान्यता देण्यात आलेली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२७-०२-२०१८) :** (१) स्थानिक आमदारांनी जेट्टी बांधुन मिळणेबाबतचे मागणी पत्र महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई व आयुक्त, मत्स्यव्यवसाय, मुंबई या कार्यालयाकडे प्राप्त झालेले नाही.

(२) सदर जेट्टी बांधकामास महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्याकडुन मान्यता देण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यात गेल्या ३० ते ३५ वर्षापासून वास्तव्य करणाऱ्या रहिवाशांची घरे हटविण्यापूर्वी त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(३) ८९३३ (०८-०४-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात गेल्या ३० ते ३५ वर्षापासून वास्तव्य करणाऱ्या रहिवाशांनी घरे हटविण्यापूर्वी त्यांचे प्रथम पुनर्वसन करण्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.रेल्वे मंत्री, केंद्र शासन यांचेकडे मागणी करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३० ते ३५ वर्षे वास्तव्य असणाऱ्या रहिवाशांची घरे हटविण्यापूर्वी त्यांचे पुनर्वसन करणाऱ्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०१-२०१८) :** (१) होय.

(२) सदरची बाब केंद्र शासनाशी सबंधित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शुन्य शेतकरी आत्महत्या मोहिमेबाबत**

**(४) २८२८२ (२२-१२-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने शुन्य आत्महत्या करण्याची मोहिम हाती घेण्याचा निर्णय माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर योजना किती ठिकाणी राबविण्यात येणार आहे त्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे, सदर योजनांची अंमलबजावणी कोणाकडून करण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०१-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) कमीत कमी पाणी वापरून जास्तीत जास्त पिके होण्याबाबतचे शेती विषयक कार्यक्रम प्रत्येक गावात राबविणे, सावकाराकडून शेतकऱ्यांचे शोषण होणार नाही यादृष्टीने कडक उपाययोजना करणे, तणाव मुक्तीसाठी समुपदेशन करणे, नैराश्याने ग्रासलेल्या शेतकऱ्यांचे मनोबल उंचावणे, आत्महत्याग्रस्त क्षेत्रासाठी जिल्हास्तरीय/ग्रामस्तरीय समित्यांमार्फत, बळीराजा चेतना अभियान राबविणे, पथदर्शी प्रकल्पांतर्गत यवतमाळ व उस्मानाबाद या दोन जिल्ह्यांची निवड करणे, कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची पुनर्रचना करणे.

(३) पथदर्शी प्रकल्पांतर्गत यवतमाळ व उस्मानाबाद या दोन जिल्ह्यांची निवड करण्यात आली असून जिल्हास्तरीय/ग्रामस्तरीय समित्यांना सन २०१५-१६ ते २०१७-१८ पर्यंत यवतमाळ जिल्ह्याला रूपये ४०,७८,६०,०००/- तसेच उस्मानाबाद जिल्ह्याला रूपये ३१,९०,९०,०००/- निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

---

**उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या जनावरांच्या दावणीवर चारा मिळणेबाबत**

**(५) ३३८०६ (०८-०१-२०१६). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या जनावरांच्या दावणीवर चारा मिळणेबाबत उमरगा लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, यांना दिनांक १९ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(३)असल्यास चौकशीच्या अनुषंगाने जनावरांच्या दावनीवर चारा मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१५/प्र.क्र.२४८/म-७, दिनांक २० ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णयान्वये बीड, लातूर व उस्मानाबाद जिल्हयातील टंचाईग्रस्त भागात आवश्यक तेथे जनावरांच्या छावण्या सुरू करण्यास मंजूरी देण्यात आली होती. त्यानुसार उस्मानाबाद जिल्हयात ९२ चारा छावण्या मंजूर करण्यात आल्या असून उमरगा तालुक्यात २ चारा छावण्या मंजूर करण्यात आल्या होत्या.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोरपना (जि.चंद्रपूर) तहसिलदार कार्यालयावर शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मोर्चा काढल्याबाबत

**(६) ३५०४२ (२३-१२-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरपना (जि.चंद्रपूर) तहसिलदार कार्यालयावर दिनांक १ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या सुमारास शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शेतकरी संघटनेने आपल्या मागण्यांचे निवेदनही दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनात त्यांनी कोणकोणत्या मागण्या केल्या आहेत व त्या मागण्यांवर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०१-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर निवेदनात खालीलप्रमाणे मागण्या केलेल्या आहेत :-

A. मौजे ईरई, बोरगांव, सोनुर्ली, विरुर, कवठाळा, खैरगांव या गावातील कपाशीचे पिक नव्या रोगामुळे उध्वस्थ झाल्यामुळे त्यांना आर्थिक मदत व बियाने तात्काळ देण्यात यावे व त्यांचे कर्ज व विजबिल कायमचे संपविण्यात यावे.

B. अंबुजा सिमेंट कंपनीने टु-फोर डी हे प्रभावी तणनाशक फवारल्यामुळे उपरवाही मुंगी येथील अठरा शेतकऱ्यांच्या नुकसान झालेल्या उभ्या पिकांचे नुकसानीबद्दल त्यांना तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी.

C. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त चौदाही जिल्हयातील शेतकऱ्यांचे कर्ज विजबील संपविण्यात यावे.

D. शेतीत मार्शल प्लॅन लाऊन सर्व शेतकऱ्यांवरील कर्ज व विजबील संपवून त्यांना नवे कर्ज मिळण्याकरीता व बाजारपेठेचे व तंत्रज्ञानाचे स्वातंत्र्य देण्यात यावे.

E. शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारीत रास्तभाव देण्यात यावा.

F. वनहक्क कायद्यात इतर पारंपारिक नवनिवासी यांना पट्याकरीता तीन पिढ्यांच्या पुराव्याची असलेली अट रद्द करण्यात यावी व जबरान शेतकऱ्यांना तातडीने पट्टे देण्यात यावेत.

G. चंद्रपूर जिल्हा व विदर्भातील लोडशेडींग बंद करण्यात यावी.

H. स्थानिक या शब्दाची महाराष्ट्रात पंधरा वर्षे राहणारा ही व्याख्या बदलवुन जेथे प्रकल्प खान उद्योग सुरु होतो त्या गावातील, तालुक्यातील, जिल्ह्यातील प्रवेशातील अशी करण्यात यावी व बेरोजगारांना रोजगार मिळावा.

I. नागपूर राजधानीसह विदर्भातील अकरा जिल्ह्याचे स्वतंत्र विदर्भ राज्य तातडीने निर्माण करण्यात यावे.

J. इतर वन्यप्राण्याप्रमाणे साप चावून मरणाऱ्या व्यक्ती व जनावरास इतर वन्यप्राण्याप्रमाणे त्याच दराने आर्थिक मदत देण्यात यावी.

K. महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवरील कोणत्याही न्यायालयात वाद सुरु नसल्यामुळे वगळण्यात यावी.

L. शेतीची जमीन अकृषक केल्यावर मालमत्ता कर ठेऊन अकृषक सारा संपविण्यात यावा व दुहेरी करपद्धत रद्द करावी.

M. मंजूर असलेल्या प्राथमिक स्वास्थ्य केंद्र नांदा, शेणगांव विरुर स्टे भंगाराम तळोधी याला तातडीने निधी देऊन सेवेचे कामे सुरु करण्यात यावे

N. महापारेषणच्या मंजूर असलेल्या कवठाळा, पांढरपौणी, विहीरगांव, तोहोगांव, भंगाराम तळोधी या सबस्टेशन करीता तातडीने निधी देऊन काम सुरु करण्यात यावे.

O. लोअर पैणगंगा धरणाचे काम सिंचन सोयी वाढविण्याकरीता तातडीने सुरु करण्यात यावे.

P. निम्न पैनगंगा प्रकल्पातील निर्बंध हटविल्याने अंमलबजावणी होण्याबाबत.

Q. सन २०१३-२०१४ मधील अतिवृष्टीचा मोबदला मिळण्याबाबत.

यामधील “सन २०१३-२०१४ मधील अतिवृष्टीचा मोबदला मिळण्याबाबत” या मागणीबाबत शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक ३१.०१.२०१४ व दिनांक २०.०३.२०१४ नुसार सन २०१३ व सन २०१४ मध्ये अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या जिल्ह्यांकरीता मदत देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

उर्वरित अन्य मागण्यांच्या पूर्ततेसाठी संबंधित विभागांना दिनांक २४.१०.२०१७ रोजीच्या पत्रान्वये उचित कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जुन्या पाटबंधारे प्रकल्पात कब्जे हक्काची रक्कम भरून न घेता शेतकऱ्यांना भोगवटदार २ ची वाटप झालेली जमीन भोगवटदार १ मध्ये रुपांतरीत न झाल्याबाबत**

**(७) ३९९५५ (२०-०४-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्या पाटबंधारे प्रकल्पात कब्जे हक्काची रक्कम भरून न घेता शेतकऱ्यांना भोगवटदार २ ची वाटप झालेली जमीन भोगवटदार १ मध्ये रुपांतरीत केलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास त्यामुळे बहुतांशी प्रकल्पग्रस्तांना बँकांचे कर्ज काढणे खरेदी विक्री करणे अशा कामांना अडचणी निर्माण होत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास शासनाने वर्ग २ जमीन शेरा सातबारा पत्रकी ठेवल्यामुळे अनेक प्रकल्पग्रस्त आर्थिकदृष्ट्या अक्षरशः मेटाकुटीला आले आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास प्रकल्पग्रस्तांच्या भोगवटदार वर्ग-२ जमिनी वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणेबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०२-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) राज्यात काही जिल्हयांमध्ये प्रकल्पबाधित व्यक्तीला मंजूर करावयाची पर्यायी जमीन त्या व्यक्तीने पूर्वीच धारण केलेल्या जमिनीच्या भोगवटाविषयक स्थितीसह मंजूर करण्याबाबत असलेल्या अधिनियमातील तरतूदींचे पालन होत नसल्याची बाब निदर्शनास येत असल्यामुळे शासन परिपत्रक दिनांक २० जुलै, २०१६ अन्वये पुढील प्रमाणे सूचना देण्यात आलेल्या आहेत.
अ) महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ लागू झाल्याच्या तारखेनंतर प्रकल्पग्रस्तांस वाटप(मंजूर) करण्यात येणारी पर्यायी जमीन महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम १६ (१) नुसारच वाटप करण्यात यावी.
ब) महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ लागू केलेल्या तारखेनंतरही ज्या प्रकल्पबाधित व्यक्तीला तिची मूळ जमीन भोगवटादार वर्ग १ ची असूनही तिला वाटप केलेली जमीन भोगवटादार वर्ग २ ची असेल तर जिल्हयाधिकाऱ्यांनी भोगवटादार वर्ग -२ च्या जमिनीचे रुपांतर भोगवटादार वर्ग-१ मध्ये करावे. त्यासाठीच्या दुरुस्तीच्या नोंदी प्राधान्याने व यशाशीघ्र कराव्यात.
क) महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ लागू करण्यापूर्वीचा प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात आलेल्या जमिनीचा भोगवटा वर्ग बदलण्याची कार्यवाही शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या उपरोक्त शासन आदेशानुसार करण्यात यावी.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्याची आणेवारी ५० पैशाहून अधिक दाखविण्यात आल्याबाबत**

**(८) ५३६१३ (०८-०६-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील आणेवारी काढतांना अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे व घरबसल्या पाहणी करुन काढल्यामुळे आणेवारी वाढली असत्याचा आरोप शेतकरी बचाव समितीने माहे जानेवारी, २०१६ च्यादरम्यान करुन आणेवारी पुन्हा करण्यात यावी, श्रीगोंदा तालुक्का दुष्काळ ग्रस्त म्हणून जाहिर करुन त्यानुषंगाने मदत करण्यात यावी अशाही मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्रीगोंदा तालुक्यातील वास्तविकता, वेगळी असून याची माहिती घेणे गरजेचे असून तसे केले नाहीतर परिस्थिती वेगळी व आणेवारी वेगळीच असे दृष्य पाहावयाला मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ८ दिवसांच्या आत तालुक्यातील मंडळ आधिकारी, तलाठ्यांनी गावानिहाय पंचनामे करुन आणेवारी ठरवावी नाहीतर तहसिल कार्यालयासमोर प्राणांतिक उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा शेतकरी बचावसमितीने दिला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०१-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

श्रीगोंदा तालुक्याची रब्बी २०१५-१६ मधील अंतिम आणेवारी दिनांक १५/३/२०१६ रोजी जाहीर करण्यात आली असून श्रीगोंदा तालुक्यातील सर्व ११५ गावांची आणेवारी ३० पैशांपेक्षा कमी आहे. आणेवारी ५० पैशांपेक्षा कमी आलेल्या गावांमध्ये विविध उपाययोजना जाहीर करून पिक विमा न काढलेल्या शेतकऱ्यांना पिक विमा योजनेअंतर्गत मंडळ निहाय मंजूर झालेल्या नुकसान भरपाईच्या ५०% प्रमाणे रक्कम मदत म्हणून देण्याचा निर्णय दि.२९/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार श्रीगोंदा तालुक्यासाठी रूपये १३,१३,०५,५४६/- एवढा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वेंगुर्ला, मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील मालवण समुद्रात स्फोट सदृश आवाजाने ग्रामस्थांचे झालेले नुकसान

**(९) ५४५२६ (२२-०८-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वेंगुर्ला तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) मालवण समुद्रात दिनांक १८ एप्रिल, २०१६ रोजी सकाळी ११.५० च्या सुमारास २ स्फोट सदृश आवाजा बरोबरच जमिनीला बसलेल्या हादऱ्यामुळे नवाबाग येथील जयश्री वसंत आरावंदेकर यांच्या व अन्य ग्रामस्थांच्या घरांच्या भिंतीला तडे गेले आहेत तसेच मालवण तालुक्यातील आचरा समुद्रा लगतचा काही भाग दिनांक २१ एप्रिल, २०१६ रोजी ३'४ फुटाणे खचण्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्फोटाचे आवाज ही सागरी भूकंपाची नांदी असण्याची शक्यता भूगर्भ शास्त्रज्ञ डॉ.एम.के.प्रभू यांनी दिनांक २० एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास जाहिररित्या व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, समुद्रात उत्तरेच्या दिशेने उपरचे वारे याचा वेग वाढल्याने व याच कालावधीत दिनांक ७ व १८ एप्रिल, २०१६ या दोन दिवसात निवंती या समुद्रभागात स्फोट झाल्याने अचानकपणे भूगर्भातील हालचाली वाढल्या असून त्यासुमारे ५ मीटर उंचीच्या लाटा किनारी येवून समुद्राला उधाणाची स्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, समुद्रात स्फोट सदृश आवाजाच्या घडलेल्या प्रकाराबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) अशी बाब नाही.
(३) हे खरे नाही.
(४) होय.
(५) चौकशीअंती समुद्रात स्फ्फोट सदृश आवाजाच्या घटना घडलेल्या नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील डोंगरगाव व महागाव, लालनाला व पोथरा नाला येथील ग्रामस्थांचे पुर्नवसन करुन नागरी सुविधा पुरविण्याबाबत**

**(१०) ५४५४३ (२२-०८-२०१६). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील डोंगरगाव व महागाव येथील ग्रामस्थांचे पुर्नवसन व लालनाला व पोथरा नाला प्रकल्पामधील प्रकल्पग्रत शेतकरी गेल्या अनेक वर्षापासून नागरी सुविधा मिळण्यापासून वंचित राहिले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिंगणघाट तालुक्यातील डोंगरगाव व महागाव येथील ग्रामस्थ व लालनाला व पोथरा नाला प्रकल्पांमधील प्रकल्पग्रस्त शेतकरी यांनी पुर्नवसन व नागरिक सुविधा मिळण्याबाबत शासनाकडे अनेक वेळा लेखी निवेदन दिली असून सुध्दा त्यांना नागरिक सुविधांपासून वंचित ठेवले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, हिंगणघाट तालुक्यातील डोंगरगाव व महागाव ग्रामस्थांना व लालनाला, पोथर नाला प्रकल्पातील शेतकऱ्यांना शासनाने तात्काळ नागरिक सुविधा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यतील डोंगरगाव व महागांव येथील लाल नाला व पोथरा नाला प्रकल्पांतर्गत पुनर्वसित गावठाणात महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९८६ चे तरतुदीनूसार यापूर्वीच देय नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात एप्रिल व मे, २०१६ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात झालेली वित्तीय व जीवितहानी**

**(११) ५४६२० (२२-०८-२०१६). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहूल कुल (दौंड), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे आणि नाशिकसह राज्याच्या कांही ठिकाणी दिनांक १२ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास अवकाळी पाऊस व गारांचीही वृष्टी होऊन मोठ्या प्रमाणात वित्त हानी तसेच वाहतूक कोंडी होऊन जनजीवन विस्कळीत झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अवकाळी पावसामुळे वीज कोसळून नाशिक जिल्ह्यात दोघांचा तर जालना जिल्ह्यात एकाचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती सदर नैसर्गिक आपत्तीत मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना तसेच वित्तहानी झालेल्या व्यक्तींना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०१-२०१८) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) सदर नैसर्गिक आपत्तीत मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना शासन निर्णय दिनांक १३.०५.२०१५ मधील तरतूदींनुसार मदत अदा करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील सन २०१५-१६ च्या रब्बी हंगामातील दुष्काळाबाबत**

**(१२) ५५०५१ (२२-०८-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यामध्ये सन २०१५-१६ च्या रब्बी हंगामामध्ये अतिशय कमी पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांची पिके नष्ट झाली व जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पिण्याच्या व शेतीच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली म्हणून माहे मे, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यामध्ये दुष्काळी परिस्थिती जाहीर केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील ११४४ गावांपैकी प्रत्येक तालुक्यात किती गावामध्ये दुष्काळी परिस्थिती जाहीर केली आहे,
(३) असल्यास, दुष्काळी भागामध्ये सवलती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०१-२०१८) :** (१), (२) व (३) होय हे खरे आहे.

महसूल व वन विभाग, दि. २७ एप्रिल, २०१६ च्या शासन निर्णयान्वये सन २०१५-१६ च्या रब्बी हंगामामध्ये अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील ११४४ गावांपैकी १०३८ गावांमध्ये दुष्काळ जाहीर करून विविध सवलती जाहीर केल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सन २०१५-१६ च्या रब्बी हंगामामध्ये पावसाअभावी पिकांचे नुकसान झाल्याबाबत**

**(१३) ५५२१४ (२४-०८-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने सन २०१५-१६ या वर्षामध्ये अपुऱ्या पावसामुळे रब्बी हंगामामध्ये झालेल्या नुकसानीमुळे मे महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यामध्ये जाहीर केलेल्या दुष्काळी गावातील दुष्काळग्रस्तांना मदत देण्यासाठी केंद्राकडे दिनांक १३ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास केंद्र सरकारकडे २००० कोटी चा अतिरिक्त मदतीचा प्रस्ताव दाखल केला आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास,चौकशीअंती अतिरिक्त मदतीचा प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०१-२०१८) :** (१) व (२) होय.
(३) केंद्र शासनाच्या दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ च्या पत्रान्वये रब्बी सन २०१५-१६ साठी राज्यास रूपये ६७१.५४ कोटी मंजूर करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात जनावरांच्या चारा छावण्या बंद करणाऱ्या संबंधित संस्था काळया यादीत टाकण्याबाबत

**(१४) ५६०९९ (२२-०८-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात दोन महिन्यांचे पैसे शासनाकडे शिल्लक राहिल्याने छावणी चालकांनी जनावरांसाठी असलेल्या चारा छावण्या बंद करण्याची परवानगी जिल्हाधिकाऱ्यांकडे मागितली असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यातील दुष्काळपरिस्थिती लक्षात घेता जनावरांच्या चारा छावण्या बंद करणाऱ्या संबंधित संस्था काळया यादीत टाकून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जालना जिल्ह्यातील जायकवाडी प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत

**(१५) ६०४४० (२६-०८-२०१६). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यातील जायकवाडी प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी सर्व जिल्ह्यातून समान जमिनी संपादित न करता ५०१६ हेक्टरपैकी ३४९७ हेक्टर जमीन ही एकटया जालना जिल्ह्यातील अंबड, घनसावंगी व परतुर तालुक्यातील आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर तीन तालुक्यातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०१-२०१८) :** (१) होय.

जायकवाडी प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी प्रकल्पग्रस्तांच्या मागणीनुसार पर्यायी जमिन उपलब्ध करुन देण्यासाठी जालना जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील अंबड,घनसावंगी व परतूर तालूक्यातील ३४९७,१५ हेक्टर जमिन त्यावेळच्या उपलब्धतेनुसार संपादीत करण्यात आली होती.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) जायकवाडी प्रकल्पामध्ये बाधित प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिन वाटप करण्यासाठी जालना जिल्हयामध्ये उपलब्ध अभिलेख्यानुसार ३४९७.१५ हेक्टर जमीन संपादीत करण्यात आली होती. त्यापैकी उर्वरीत २१५७.११ हेक्टर एवढी शिल्लक जमिनीवर आजरोजी महाराष्ट्र शासन अशी नोंद आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील दुष्काळग्रस्ताच्या मदतीसाठी केंद्र शासनाकडे पुरवणी प्रस्ताव पाठविण्याबाबत**

**(१६) ६३४२० (२२-०८-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दुष्काळाबाबत मा.पंतप्रधान यांच्या अध्यक्षतेखाली माहे मे, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात दिल्ली येथे झालेल्या उच्च समितीच्या बैठकीत आढावा घेण्यात आला, त्यावेळी मा.मुख्यमंत्र्यांनी दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी केंद्र शासनाकडे पाठविलेल्या पुरवणी प्रस्तावाच्या अनुषंगाने अतिरिक्त निधीची मागणी केंद्राकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किती अतिरिक्त निधीची मागणी केंद्र शासनाकडे करण्यात आली व केंद्र शासनाने किती अतिरिक्त निधी देण्याचे मान्य केले आहे,
(३) असल्यास, सदर निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) केंद्र शासनाकडे पुरवणी ज्ञापनद्वारे १३ मे २०१६ रोजीच्या पत्रान्वये रूपये २०१७.५४ कोटी रूपयांची मागणी करण्यात आली होती. केंद्र शासनाने खरीप २०१५-१६ साठी ५८९.४७ कोटी निधी राज्य शासनास उपलब्ध करुन दिला आहे. शासन निर्णय दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये रूपये १२९६.१० कोटी इतका खरीप २०१५ मध्ये बाधित शेतकऱ्यांना अर्थसहाय्य करण्यासाठी वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हयामध्ये सन २०१६ मध्ये जाहीर झालेली आणेवारी रद्द करुन पुन्हा एकदा नव्याने सर्व्हेक्षण करुन सुधारित आणेवारी जाहीर करण्याबाबत**

**(१७) ६५९७६ (१६-१२-२०१६). श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयामध्ये चालु वर्षामध्ये (२०१६) जाहीर झालेली आणेवारी रद्द करुन पुन्हा एकदा नव्याने सर्व्हेक्षण करुन सुधारित आणेवारी जाहीर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.कृषी मंत्री यांच्याकडे दिनांक १६ ऑक्टोबर, २०१६ रोजी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती नव्याने आणेवारी जाहीर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१३/प्र.क्र.२०७/म-७, दिनांक ३ नोव्हेंबर, २०१५ अन्वये ५० पैशांपेक्षा कमी आणेवारी आलेल्या गावांमध्ये दुष्काळ/दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर करून त्यानुषंगाने विविध उपाययोजना करण्यात येतात. उस्मानाबाद जिल्ह्यातील रब्बी व खरीप पिकांची अंतीम आणेवारी जाहीर करण्यात आली असून ५० पैशांपेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावांची संख्या निरंक आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुंठेफळ (ता.आष्टी, जि.बीड) साठवण तलाव येथील ५ गावांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(१८) ६६०९९ (१६-१२-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुंठेफळ (ता.आष्टी, जि.बीड) साठवण तलाव येथील ५ गावांचे पुनर्वसन आजमितीपर्यंत करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू गावांचे तातडीने पुनर्वसन करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती ठोस कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) असल्यास, सदरहू गावांचे पुनर्वसन किती कालावधीत होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०१-२०१८) :** (१) केंद्रीय पर्यावरण,वन व हवामान बदल विभाग दिल्ली यांनी दिनांक १२/०२/२०१४ च्या पत्रान्वये योजनेचे काम बंद ठेवण्याबाबत निर्देश दिलेले असल्यामुळे सद्य:स्थितीत कृष्णा मराठवाडा प्रकल्पातंर्गत आष्टी उपसा सिंचन योजना क्र.ता.आष्टी जि.बीड या योजनेसाठी कुंटेफळ व कुंभेफळ या गावांचे विस्थापन करण्यात आलेले नाही.
(२) उपसा सिंचन या योजनेसाठी प्रथम टप्प्यात उपलब्ध झालेल्या १०६८ अ.घ.फु.पाणी वापराच्या मर्यादेत कुंठेफळ साठवण तलावाच्या बुडीत क्षेत्रात येणा-या कुंठेफळ व कुंभेफळ या दोन गावांचे पुनर्वसन करणेच्या दृष्टीने जिल्हाधिकारी बीड यांनी स्थापन केलेल्या पुनर्वसन

समितीने कुंठेफळ गावाच्या पुनर्वसनासाठी तीन जागेची पहाणी केली असून यापैकी एक जागा निश्चित करण्यासाठी संबंधीत ग्रामपंचायत यांना उपविभागीय अधिकारी आष्टी/पाटोदा यांनी कळविले आहे. तसेच पुनर्वसन होणाऱ्या गावठाणातील बाधित कुटुंब संख्या निश्चित करण्याबाबतचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) गावठाणातील बाधित कुटुंब संख्या व गावठाण जागा निश्चितीबाबत कार्यवाही प्रगतीपथावर असून सदर पुनर्वसनाची कामे २०१९ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौज पुसदा (ता.जि.अमरावती) येथे पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी पाईप लाईन न टाकल्यामुळे अंदाजे २५ ते ३० एकर शेतकऱ्यांची जमिन बाधित झाल्याबाबत**

**(१९) ६७९२५ (१९-१२-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौज पुसदा (ता.जि.अमरावती) येथे पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी पाईप लाईन न टाकल्यामुळे अंदाजे २५ ते ३० एकर शेतकऱ्यांची जमिन बाधित झाली असल्यामुळे शेत जमीनीच्या झालेल्या नुकसानाची भरपाई मिळणेबाबतचे बाधित झालेल्या शेतकऱ्यांचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ४ जुलै, २०१६ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पाणी वाहून जाण्याची व्यवस्था करण्याबाबत तसेच झालेल्या नुकसानाची शेतकऱ्यांना भरपाई मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०२-२०१८) :** (१) होय.
(२) उक्त निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या दिनांक १३.०७.२०१६ रोजीच्या पत्रान्वये व तहसिलदार, अमरावती यांच्या दिनांक १७.०८.२०१६ रोजीच्या पत्रान्वये, विभागीय प्रबंधक, मध्य रेल्वे विभाग, नागपूर यांना अमरावती-भुसावळ-नरखेड रेल्वे मार्गावर पाईप लाईन टाकण्याबाबत तसेच पाणी वाहून जाण्याची व्यवस्था करण्यासाठी नियमानुसार तात्काळ कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

पाईप लाईन न टाकल्याने शेतजमीन बाधित झालेल्या आपदग्रस्तांना शासन नियमानुसार मदत अनुज्ञेय नसल्याने उपरोक्त प्रकरणी बाधित झालेल्या आपदग्रस्तांना मदत देण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील खरीप हंगामाच्या हजारो हेक्टरी पिके पाण्याखाली गेल्यामुळे शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविण्याबाबत**

**(२०) ६७९३६ (१६-१२-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील परतीच्या पावसाने कायम जोर धरल्यामुळे खरीप हंगामाच्या हजारो हेक्टरी पिके पाण्याखाली गेल्यामुळे वाया गेलीत त्यामुळे शेतमजुरांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा राहिला असल्याचे दिनांक २९ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविण्याबाबत तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत शासनने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०२-२०१८) :** (१) नांदेड जिल्ह्यात माहे जून ते ऑक्टोबर २०१६ या कालावधीत अतिवृष्टी व पुरपरिस्थितीमुळे शेतीपिके/फळपिकांच्या एकूण ५,४६,०११ हे. क्षेत्राचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले.

(२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक ०९ जानेवारी २०१७ अन्वये, राज्यात माहे जून ते ऑक्टोबर २०१६ च्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत मंडळनिहाय भरपाईची जी रक्कम देय असेल त्या रकमेच्या ५० टक्के रक्कम प्रधानमंत्री पिक विमा योजनेत सहभागी न झालेल्या शेतकऱ्यांना मदत म्हणून देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोकणात जून-जुलै, २०१६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीत मालमत्ता व शेतीचे नुकसान झाल्याबाबत**

**(२१) ७३६३५ (१६-१२-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात जून-जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीत मोठ्या प्रमाणावर मालमत्ता व शेतीचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नुकसानीचे पंचनामे करण्यात आले आहेत काय,

(३) असल्यास, पंचनामेअंती कोकणात झालेल्या अतिवृष्टीतील नुकसानग्रस्तांना तातडीने नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०१-२०१८) :** (१) कोकणात जून-जुलै २०१६ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीत मालमत्ता व शेतीचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) होय.
(३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक ०९ जानेवारी २०१७ अन्वये, माहे जून ते सप्टेंबर, २०१६ च्या अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांना पिक नुकसानीवर मदत देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक १३ मे २०१५ मधील तरतूदींनुसार पात्र आपदग्रस्तांना जिल्हाधिकारी कार्यालयांकडून मदत वाटप करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पीकविम्याची भरपाई न मिळालेल्या शेतकऱ्यांना**
**सुमारे २ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर झाल्याबाबत**

**(२२) ७४१७६ (१६-१२-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सुमारे ३२ हजार गावांमधील पीकविम्याची भरपाई न मिळालेल्या ४५ ते ५० लाख शेतकऱ्यांसाठी सुमारे २ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले असल्याचे माहे डिसेंबर २०१६ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्यापपर्यंत किती शेतकऱ्यांना पीक विम्याची भरपाई दिली व देणे शिल्लक आहे,
(३) असल्यास, चौकशीअंती पिक विम्याची भरपाई न मिळालेल्या शेतकऱ्यांना शासनाने भरपाई देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) खरीप हंगाम २०१५ मध्ये राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत राज्यातील ८२.५० लाख शेतकरी सहभागी झाले होते. त्यापैकी ७१.५० लाख शेतकऱ्यांना ४२०५.०५ कोटी नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे. भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत प्राप्त अहवालानुसार अद्याप पर्यंत ७०.४५ लाख शेतकऱ्यांना रक्कम रूपये ४०६३.५५ कोटी नुकसान भरपाई करण्यात आली आहे.
(३) रब्बी २०१५ मध्ये अहमदनगर व सोलापूर जिल्ह्यातील १९९१ गावातील शेतकऱ्यांना ज्यांनी पीक विमा योजना घेतली नाही त्यांना पीक विमा योजना घेतलेल्या शेतकऱ्यांना मंजूर होणाऱ्या मंडळनिहाय नुकसान भरपाईच्या ५०% प्रमाणे मदत देण्याचा निर्णय महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१६/प्र.क्र.२१९/म-७, दिनांक २९.१२.२०१६ अन्वये घेण्यात

आला. त्यानुसार या मदतीसाठी अहमदनगर व सोलापूर जिल्ह्यांना अनुक्रमे रू.१३३ कोटी व रू.५७.५२ कोटी वितरीत करण्यात आले आहेत.

खरीप २०१५ मधील औरंगाबाद, नाशिक, अमरावती व नागपूर विभागातील कापूस उत्पादक व अमरावती, नागपूर विभागातील सोयाबीन शेतकऱ्यांना पीक विमा योजना घेतलेल्या शेतकऱ्यांना मंजूर होणाऱ्या मंडळनिहाय नुकसान भरपाईच्या ५०% प्रमाणे मदत देण्याचा निर्णय महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१६/प्र.क्र.१/म-७, दिनांक २९.१२.२०१६ अन्वये घेण्यात आला. त्यानुसार यासाठी एकूण रू.१२९६ कोटी निधी वितरीत करण्यात आला.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील पडीक जमिनीवर पिक घेणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांना नैसर्गिक आपतीमुळे होणाऱ्या पिक नुकसानीची भरपाई मिळणेबाबत**

**(२३) ७५१७६ (१६-१२-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांना भविष्यात नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान होणाऱ्या शेत पिकांचे पंचनामे करून त्यांना नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.आदिवासी विकास मंत्री, यांच्याकडे निवदेनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतांशी आदिवासींच्या नावावर जमिन नसल्यामुळे आपल्या उपजीवीकेसाठी पडीक जमीनीवर भाजीपाला व अन्य पिके घेवून बाजारात विक्री करतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नैसर्गिक आपतीमुळे नुकसान झाल्यास पडीक जमिनीवरील शेतीचे पंचनामे केले जात नसल्यामुळे आदिवासी शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आदिवासी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी म्हणुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व कार्यवाहीचे स्वरूप काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०२-२०१८) :** (१) सदर बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) होय.

(३) आदिवासी शेतकऱ्यांकडून पडीक जमीनीवरील शेतीमध्ये रब्बी हंगामात भाजीपाला व अन्य पिके घेतली जातात. रायगड जिल्ह्यात रब्बी हंगामात नैसर्गिक आपत्तीची घटना घडलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोसेखुर्द प्रकल्पात ७० टक्के शेती बाधित झालेल्या गांवाचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(२४) ७५३६३ (१६-१२-२०१६). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ७० टक्के च्या वर शेतजमीन अधिग्रहित केली असल्यास त्या गावाचे पुनर्वसन करणे आवश्यक असल्याने गोसेखुर्द प्रकल्पात ७० टक्के शेती बाधित झालेल्या शेतकऱ्यांनी सुरबोडी, खापरी, निमगाव, नेरला, तिडी, सालेबर्डी, मेंढा, (गराडा) इत्यादी गावांची पुनर्वसनाची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पवनी (जि.भंडारा) तालुक्यातील वैनगंगा नदीच्या काठावर वसलेले सुरबोडी गावाचे सन २०१२ पासून पुनर्वसनाचा प्रश्न शासनस्तरावर प्रलंबित असून सुरबोडी या गावाभोवती दलदलीचे प्रमाण वाढल्यामुळे येथील नागरिक व जनावरांना विविध रोगांचा त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोसेखुर्द प्रकल्पातील सदरहू गावांचे तातडीने पुनर्वसन करण्यासाठी शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-१२-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे. मौजा सुरबोडी, खापरी, निमगांव, नेरला, तिडडी, सालेबर्डी, मेंढा(गराढा), इ. गावकऱ्यांकडून पुनर्वसनाची मागणी होत आहे. तथापि,गावठाण किंवा ७५ % शेतजमीन बाधित होत असल्यास महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ अन्वये पुनर्वसनाची करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

(३) मौजा. सुरबोडी गावांचे पुनर्वसन खास बाब म्हणून मंजूर करणेस्तव सुधारित प्रस्ताव दिनांक ९.१.२०१७ अन्वये मा.आयुक्त, नागपूर विभाग,नागपूर यांना सादर करण्यात आला आहे. मौजा खापरी (रे) व मौजा नेरला ता.पवनी येथील पुनर्वसनास विशेष बाब मंजूरीच्या प्रस्तावाची प्रक्रीया सुरु आहे. विभागीय समितीच्या आढावा बैठकीचे इतिवृत्तानुसार मौजा सालेबर्डी ता.भंडारा येथील ७५% शेती बाधित होत असल्यामुळे तसेच ग्रामसभेमध्ये ठरावाव्दारे पुनर्वसनाची मागणी असल्याने नव्याने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली असून पुनर्वसनाची प्रक्रीया सुरु आहे. तसेच मौजा तिडडी च्या सुधारित प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे डासाळा (ता.चिखली, जि.बुलडाणा) येथील शेतकऱ्यांना नापीकीचे अनुदान मिळण्यास अडचणी होत असल्याबाबत**

**(२५) ७७१०८ (१६-१२-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे डासाळा (ता.चिखली, जि.बुलडाणा) येथील शेतकऱ्यांचे नापीकीचे अनुदान मिळाले नसल्याने तेथील अंदाजे ५० शेतकरी वारंवार तलाठी, बँक व तहसिल कार्यालयात फेऱ्या मारीत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कारणास्तव शेतकऱ्यांची आर्थिक गैरसोय होत असून त्यांना वारंवार संबंधित कार्यालयात चकरा माराव्या लागत असल्याने त्यांना शारिरिक व मानसिक त्रास होत आहे हे लक्षात घेता शासनाने यासंदर्भात चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, तद्नुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजे डासाळा येथील ४०६ खातेदारांना सन २०१५ चे खरीप हंगामातील रू. ३०,९६,९९२/- इतके अनुदान बँकेमार्फत वितरीत करण्यात आले असून ६ खातेदारांचे बँके खाते क्रमांक चुकीचे असल्यामुळे ते दुरूस्त करून अनुदानाची रक्कम संबंधितांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे.

---

**तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील निम्न वर्धा प्रकल्प, वर्धा जिल्ह्यातंर्गत येणाऱ्या धारवाडा, दुर्गवाडा येथील प्रकल्पग्रस्तांची पुर्नवसनाची कामे पूर्ण करणेबाबत**

**(२६) ७७२५८ (१६-१२-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील निम्न वर्धा प्रकल्प, वर्धा जिल्ह्यांतर्गत येणाऱ्या धारवाडा, दुर्गवाडा येथील प्रकल्पग्रस्तांची पुर्नवसनाची कामे त्वरीत पूर्ण करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.राज्यमंत्री सार्वजनिक बांधकाम यांना दिनांक २ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देऊनही अद्याप त्यावर कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय
(२) असल्यास, शासनाने सदर दोन्ही गावातील मुलभुत सुविधांची कामे पूर्ण करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०२-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

निम्न वर्धा प्रकल्पांतर्गत बाधित झालेल्या तिवसा तालुक्यातील धारवाडा, दुर्गवाडा पुनर्वसित गावांचे पुनर्वसनाचे गाव स्थलांतरीत करण्याकरिता आवश्यक कामे पूर्ण झाली आहे. गावकऱ्यांच्या मागणीनुसार शेती पोच रस्त्याची कामे प्रगतीपथावर आहे व मार्च २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात सर्वात जास्त थंडी सिंध्दपिंप्री (जि.नाशिक) परिसरात झाल्याने द्राक्ष पिकांचे झालेले नुकसान**

**(२७) ७८५९० (१३-०४-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वात जास्त थंडी सिंध्दपिंप्री (जि.नाशिक) परिसरात झाल्याने द्राक्ष बागांचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने पाहणी केली आहे काय व पाहणीचे निष्कर्ष काय आहेत

(३) असल्यास, पाहणीअंती नुकसानग्रस्त द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१८) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील जळगाव आर्वी (ता.धामणगाव रेल्वे) येथील सन १९९४ च्या पूरपिडीताना राहात्या जागेचे कायम पट्टे मिळण्याबाबत**

**(२८) ७९६१३ (१३-०४-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील जळगाव आर्वी (ता.धामणगाव रेल्वे) येथील पूरपिडीताना सन १९९४ च्या महापूरामुळे धामणगाव रेल्वे आठवडी बाजार येथून जळगाव आर्वी येथे स्थलांतरीत करण्यात आले होते, तेव्हापासून सदर कुटुंबे जळगाव आर्वी येथे राहत आहे, परंतू अद्यापही त्यांना राहात्या जागेचे कायम पट्टे दिल्या गेले नाही, हे खरे आहे काय,

(२) यासंदर्भात शासनाने कोणती चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) तद्नुसार शासनाने संबंधीत पूरपिडीतांना कायम जागेचे पट्टे मिळण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) उपविभागीय अधिकारी चांदुर रेल्वे यांच्या दि. ०३.११.२०१६ च्या अहवालानुसार मौजा दत्तापूर ता.धामणगाव रेल्वे येथील १९९४ च्या महापूरामुळे बाधीत झालेल्या कुटूंबाना जळगाव आर्वी ता. धामणगाव रेल्वे येथे तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतरीत करण्यात आले होते. सदर गाळे बेघर झालेल्या लोकांना दि.७.११.१९९४ पर्यंत अस्थायी गाळे बांधण्यात आलेले होते. त्यामुळे कायम पट्टे देणेबाबत प्रश्न उद्भवत नाही.

सदरील १७ बाधीत कुटूंबांचे इतर जवळच्या गावात शासकीय जागेवर पुनर्वसन करता येईल किंवा कसे, याबाबत तहसिलदार धामणगाव रेल्वे यांचे स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पानशेत वरसगाव धरणग्रस्तांना वाटप करण्यात आलेल्या वनसंवर्गातील जमिनींबाबत**

**(२९) ७९६३९ (१२-०४-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि.पुणे) तालूक्यातील पानशेत वरसगाव धरणग्रस्तांना वाटप करण्यात आलेल्या वनसंवर्गातील जमिनींचा नवीन शर्त शेरा कमी करणेबाबत जिल्हाधिकारी यांचेकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे शेरे कमी करण्यासाठी शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात येत आहे वा आली आहे,
(३) असल्यास, सद्यस्थितीत किती शेरे कमी करण्यात आले आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०२-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) पानशेत, वरसगांव प्रकल्पग्रस्तांना राखीव वन असलेले क्षेत्र पर्यायी जमीन म्हणून वाटप करण्यात आलेले आहे. सदरच्या राखीव वन क्षेत्राचा निर्वनीकरणाचा प्रस्ताव विहित पध्दतीने केंद्र शासनास सादर करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेकडून आवश्यक कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आमणी बु. व मुडाण (ता.महागांव, जि.यवतमाळ) या परिसरातील नाल्यातील पूराच्या पाण्यामुळे शेतीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्याबाबत**

**(३०) ७९८६२ (१३-०४-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आमणी बु. व मुडाण (ता.महागांव, जि.यवतमाळ) सन २०१६ च्या पावसाळ्यात या परिसरातील नाल्यातील पूराचे पाणी शेजारच्या शेतात शिरुन शेतीचे नुकसान झाल्याबाबत शेतक-यांनी नुकसानभरपाई मिळणेबाबत वारंवार मागणी करुनही अद्यापही त्यांना नुकसान भरपाई मिळालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी करुन नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसानभरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०१-२०१८) :** (१) व (२) माहे जून ते ऑक्टोबर २०१६ या कालावधीत राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी व पुरपरिस्थिती यामुळे शेतीपिके/फळपिके यांचे नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्यांना पिकविमा योजनेवर आधारित शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक ०९ जानेवारी २०१७ अन्वये मदत देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बल्लारपूर (जि.चंद्रपूर) येथील प्रसिध्द बल्लारपूर पेपर मिलमधील न्यू कॉलनी परिसरातील रोपवाटिकेला आग लागल्याबाबत**

**(३१) ८०८०३ (१३-०४-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बल्लारपूर (जि.चंद्रपूर) येथील प्रसिध्द बल्लारपूर पेपर मिलमधील न्यू कॉलनी परिसरातील रोपवाटिकेला दिनांक ७ जानेवारी, २०१७ रोजी च्या सुमारास अचानक आग लागली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आगीत किती वित्त्त हानी झाली आहे,
(३) असल्यास, या आगीचे कारण काय आहे,
(४) असल्यास, याबाबत शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर आगीत अंदाजे रु. ४,३२,६००/- इतकी वित्तहानी झाली आहे.
(३) सदर रोपवाटीकेला लागलेल्या आगीबाबत पोलिस स्टेशन बल्लारपूर येथे अज्ञात व्यक्तींवर अदखलपात्र गुन्ह्यांची नोंद घेण्यात आली आहे.
(४) आग लागून रोपवाटीकेचे नुकसान झाल्याबाबत नुकसानभरपाई देण्याची तरतूद नसल्याने, बाधितांना नुकसानभरपाई देण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्ह्यातील अवकाळी पावसासह गारपिटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अर्थिक मदत मिळणेबाबत**

**(३२) ८१६५४ (१३-०४-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्ह्यामध्ये माहे डिसेबर, २०१४ व जानेवारी, २०१५ च्या कालावधीत अवकाळी पावसासह गारपीट झाल्यामुळे शेतकऱ्यांचे गहु, हरबरा, कांदा, फळबाग, भाजीपाली यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या निकषाप्रमाणे नुकसानी सदंर्भात महसुल व कृषी विभागामार्फत सर्व्हेक्षण व पंचनामे करुन शासनास अहवाल सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माहे डिसेबर, २०१४ व जानेवारी, २०१५ च्या अगोदरील व नंतर झालेल्या गारपीटीच्या नुकसानीची मदत शेतकऱ्यांना देण्यात आली परंतु सदर कालावधीतील नुकसानीची मदत शेतकऱ्यांना देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कालावधीतील नुकसानाची मदत देण्यासदंर्भात स्थानिक लोकप्रतिनीधीने दिनांक ३ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सदर कालावधीतील रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही. माहे डिसेंबर, २०१४ व जानेवारी, २०१५ या कालावधीतील गारपिटमुळे झालेल्या नुकसानीची मदत रु.२.८४ कोटी बाधित शेतकऱ्यांना वाटप करण्यात आलेली आहे.
(४) होय.
(५) आयुक्त, कार्यालय, अमरावती यांचे दिनांक ०२.०६.२०१७ नुसार प्राप्त अनुदान रु. ४.५४ कोटी दिनांक ०६.०६.२०१७ रोजी तहसिलदार कार्यालय मालेगांव, मंगरुळपीर व कारंजा यांना उपलब्ध करुन देण्यात आलेले होते.

तहसिलदार मालेगांव यांच्याकडून ६६३३ नुकसानग्रस्त बाधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात रु.२.१९ कोटी रक्कम जमा करण्यात आलेली आहे, तहसिलदार कारंजा यांचेकडून १८९४ बाधित शेतकऱ्यांचे बँक खात्यात रु.५८.७१ लक्ष रक्कम जमा करण्यात आलेली आहे. तसेच तहसिलदार मंगरुळपिर यांचेकडून ३० बाधित शेतकऱ्यांच्या बॅक खात्यात रु.६.४० लक्ष रक्कम जमा करण्यात आलेली आहे. एकूण ८५५५ बाधित आपदग्रस्तांचे बँक खात्यात रु. २.८४ कोटी निधी जमा करण्यात आलेला आहे. अखर्चित निधी समर्पित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कारंजा (जि.वाशिम) तालुक्यातील गारपीटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत मिळण्याबाबत

**(३३) *८२९१४* (१३-०४-२०१७). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कारंजा (जि.वाशिम) तालुक्यातील सात गावामध्ये च्या माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये मोठ्या प्रमाणात गारपीट झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गारपीटमुळे झालेल्या नुकसानची पंचनामे शासनामार्फत करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१८) :** (१) कारंजा तालुक्यात (जि. वाशिम) माहे नोव्हेंबर,२०१४ मध्ये गारपिट झालेली नसून, माहे डिसेंबर,२०१४ मध्ये अवकाळी पाऊस, गारपिट झालेली होती.
(२) होय.
(३) वाशिम जिल्ह्यात माहे डिसेंबर,२०१४ व जानेवारी,२०१५ या कालावधीत झालेल्या नुकसानी-पोटी बाधित ८५५५ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात रुपये २.८४ कोटी जमा करण्यात आलेली आहेत. त्यापैकी कारंजा तालुक्यातील १८९४ बाधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात रुपये ५८.७१ लक्ष रक्कम जमा करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुनाडा-तेलवासा वेकोलीच्या ब्लास्टिंगने मृतपावलेल्या मुलीच्या वडीलांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(३४) ८४८५२ (१५-०८-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातंर्गत येणाऱ्या भद्रावती तालुक्यातील कुनाडा-तेलवासा वेकोलीने दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजी केलेल्या ब्लास्टिंगमुळे चारगाव येथील विजय दतूजी धानकी याच्या घराची भिंत कोसळून त्याची मुलगी मेघा विजय धानकी हिचा जागीच मृत्य झाला असून या ब्लास्टिंगमुळे विजय धानकी याचे संपुर्ण घर कोसळले असतांना सुध्दा वेकोलीने अघापही आर्थिक मदत न दिल्यामुळे गेल्या दोन वर्षापासून त्याला कुटूंबासमावेत ग्रामपंचायत भवनामध्ये राहावे लागत असल्याची बाब दिनांक १६ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गावातील नागरिकांनी विजय धानकी यास तातडीने आर्थीक मदत देवून त्याचे घर तातडीने बांधून दयावे अशी वारंवार मागणी करून सुध्दा वेकोली प्रशासनाने याकडे दुर्लश केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वेकोलीच्या ब्लास्टिंगमुळे मेघा विजय धानकी हिचा मृत्यू झाल्याने तिच्या वारसदारास आणि विजय धानकी याचे घर कोसळल्याने त्याला आर्थिक मदत त्वरित मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०१-२०१८) :** (१), (२) व (३) चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती तालुक्यातील चारगांव येथे दिनांक १९ जानेवारी २०१५ रोजी श्री. विजय दतूजी धानकी यांच्या घरावर बाजूच्या घराची भिंत कोसळून त्यांची मुलगी कुमारी मेघा विजय धानकी हिचा मृत्य झाला असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.

महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक १३ मे, २०१५ अन्वये सदर घटनेमुळे बाधित झालेल्या आपदग्रस्तांना नुकसानभरपाई देण्याबाबतची तरतूद नसल्याने त्यांना नुकसानभरपाई देण्यात आलेली नाही. तथापि, तहसिलदार, भद्रावती यांनी दिनांक ०२.०३.२०१५ रोजीच्या पत्रान्वये महाप्रबंधक वेस्टर्न कोलफील्ड लिमिटेड माजरी एरिआ कूचना, यांना आपदग्रस्तांना नियमानुसार आर्थिक मदत देण्याबाबत कळविले. त्याअनुषंगाने क्षेत्रीय महाप्रबंधक वेकोली माजरी क्षेत्र यांनी, मौजे चारगांव हे खाणींपासून अंदाजे २ ते ३ किलोमीटर दूर असून दिनांक १९ जानेवारी २०१५ रोजी खाणींमध्ये ब्लास्टींग करण्यात आली नसल्याने सदर घटनेचा खाणीतील ब्लास्टींगशी संबंध नाही. त्यामुळे नियमानुसार आपदग्रस्तांना आर्थिक मदत देता येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिक शहर व परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे पाणी साठून झालेले नुकसान

**(३५) ८५५६६ (१५-०८-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहर व परिसरात दिनांक १४ जून, २०१७ रोजी अतिवृष्टीमुळे गोदाकाठ व सराफ बाजारात मेन रोड रविवार कारंजा व शहरातील अन्य सखल भागांमध्ये व्यापारी संकुलामध्ये व घरांमध्ये पाणी शिरल्यामुळे तसेच वाहने वाहून गेल्यामुळे नागरिकांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०१-२०१८) :** (१) नाशिक शहर व परिसरात दिनांक १४ जून, २०१७ रोजी सुमारे ९२ मि.मी. पाऊस पडला. सदर पावसामुळे नाशिक शहरातील गोदाकाठ, सराफ बाजार, मेनरोड रविवार कारंजा व शहरातील अन्य सखल भागामध्ये पाणी शिरल्याचे निदर्शनास आले.

(२) होय. दोन व्यापारी दुकानांचे पंचनामे करण्यात आले आहेत.

(३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक १३ मे, २०१५ नुसार त्यांना मदत अनुज्ञेय नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील चित्री धरणासाठी संपादित जमिनी इतर धरणग्रस्तांना वाटप करण्यात येत असल्याबाबत**

**(३६) ८७४९८ (२१-०८-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील चित्री धरणासाठी संपादित केलेल्या जमिनी इतर धरणग्रस्तांना वाटप करण्यात येत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार चित्री प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनी अन्य धरणग्रस्तांना वाटप न करता चित्री प्रकल्पातील धरणग्रस्तांना वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०२-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) चित्री प्रकल्पाने बाधित पात्र प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन वाटपाचे काम पूर्ण झाले असल्याने चित्री प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शिल्लक असलेली जमिन उचंगी प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडून शासनास सादर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने उचंगी प्रकल्पग्रस्तांना जमिन वाटप करण्याबाबतच्या सदर प्रस्तावास दि. २७.७.२०१७ च्या पत्रान्वये शासन मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (जि.नाशिक) येथे सन २००८ मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या पिडीत नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(३७) ८८२६६ (०४-०९-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) येथे सन २००८ मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या पिडीत नातेवाईकांना अदयापही कोणतीही आर्थिक मदत देण्यात आलेली नाही तसेच त्यांना न्याय सुध्दा देण्यात आलेला नसल्याचे माहे जून, २०१७ रोजी वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त स्फोटातील मृतांच्या नातेवाईकांना आवश्यक न्याय व अर्थसहाय्य देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०१-२०१८) :** (१) व (२) नाशिक जिल्ह्यातील मालेगांव तालुक्यात सन २००८ मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटात मृत्यूमुखी पडलेल्या ६ नागरिकांच्या नातेवाईकांना प्रत्येकी ५ लक्ष रुपये इतकी आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भामा आसखेड (ता.खेड, जि.पुणे) धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी देण्यात येणारे विशेष पॅकेजबाबत**

**(३८) ८८४१८ (२२-०८-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे करंजविहीरे (ता.खेड, जि.पुणे) येथील शासकीय विश्रामगृह मधे दिनांक १६ एप्रिल, २०१७ रोजी धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी द्यावयाचे विशेष पकेज संदर्भात मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ठरल्यानुसार १३०३ प्रकल्पग्रस्तांना प्रत्येकी १० लाख रुपये याप्रमाणे देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनर्वसनासंदर्भात देण्यात येणारे विशेष पकेज प्रकल्पग्रस्तांना देण्याबाबत शासनाने कोणती कायवाही केली, तसेच कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) याबाबत निर्णय घेण्याचे अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यातील गिरसावळी येथे विहीरीत पडून शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याबाबत**

**(३९) ८८८५९ (१५-०८-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यातील गिरसावळी येथे पिकांना पाणी देण्यासाठी वीजपंप सुरु करित असताना तोल जाऊन विहीरीत पडून मधूकर चिमणाजी गाडेकर या शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०१-२०१८) :** (१) होय.
(२) शासन निर्णय दिनांक १३ मे, २०१५ अन्वये सदर दुर्घटना ही नैसर्गिक आपत्ती अंतर्गत येत नसल्याने सदर शेतकऱ्यांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील मुळा पाणलोट क्षेत्रातील अंबित गावात दरडी कोसळल्याने रस्त्यांना पडलेल्या भेगा**

**(४०) ८९६५१ (१५-०८-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील मुळा पाणलोट क्षेत्रातील अंबित गावात दरडी कोसळल्याने रस्त्यांना व घरांना मोठ्या भेगा पडल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यांची व घरांची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर रस्त्यांची दुरुस्ती आणि अंबित ग्रामस्थांचे पुनवर्सन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०१-२०१८) :** (१) होय हे खरे आहे.
(२) होय.
(३) व (४) अंबित येथील ग्रामस्थांच्या पुनर्वसनाबाबत ग्रामस्थांनी ग्रामसभा घेवून ठराव सादर करणेबाबत सरपंच, ग्रामसेवक व तलाठी यांनी सुचना दिल्या होत्या. त्यानुसार सरपंच व ग्रामसेवक अंबित यांनी दि. २.२.२०१७ रोजी ठराव सादर केला आहे. सदर ठरावात मौजे अंबित ग्रामस्थांच्या पुनर्वसनाबाबत भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण पुणे यांचा अहवाल आलेनंतर योग्य तो निर्णय घेण्यात यावा असे सर्वानुमते ठरविणेत आले आहे भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण पुणे यांचेकडील अहवालानुसार अंबित गावलगत असलेल्या डोंगरास पडलेल्या भेगीपासून भूस्खलनाचा धोका नाही.

---

## रेणापूर व कासारखेडा (जि.लातूर) येथील शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे खरीप पिकांच्या झालेल्या नुकसानाची भरपाई देण्याबाबत

**(४१) ८९७३० (२४-०८-२०१७). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यातील रेणापूर व कासारखेडा महसूल मंडळात माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०१६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे सोयाबीन व इतर खरीप पिकांचे अतोनात नुकसान झाले असून शेतकऱ्यांना अतिवृष्टीचे नुकसानीचे पंचनामे करण्याबाबत व नुकसानभरपाई देण्याबाबत बँक, महसूल व कृषी विभागास निवेदने दिली असताना तसेच मा.मुख्यमंत्री यांनी शंभर टक्के नुकसान ग्राह्य धरून कार्यवाही करण्याचे आश्वासन औरंगाबाद येथील मंत्रिमंडळ बैठकीत दिले असतानाही प्रधानमंत्री पिक विम्यास पात्र असलेल्या शेतकऱ्यांना पिक विमा व नैसर्गिक आपत्ती अंतर्गत कोणतीही नुकसानीची मदत मिळाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांना पिक विमा मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतीनिधिनी दिनांक २४ मे, २०१७ रोजी लातूर येथील आढावा बैठकीत मा.मुख्यमंत्री, मा.कृषी मंत्री, जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली होती त्या मागणीच्या अनुषंगाने राज्य शासनाच्यावतीने अपिल दाखल करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत व पीक विमा मंजुरीत झालेल्या अनियमिततेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०२-२०१८) :** (१), (२) व (३) लातूर जिल्ह्यामध्ये प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम २०१६ ही इफ्को टोकिओ जनरल इन्शुरन्स कंपनी लि. मार्फत राबविण्यात आली. सदर योजनेमध्ये लातूर जिल्ह्यातील रेणापूर व कासारखेडा महसूल मंडळातील शेतकऱ्यांच्या स्थानिक नैसर्गिक आपत्ती व उत्पादनावर आधारीत नुकसान भरपाई या बाबीअंतर्गत विमा कंपनीमार्फत एकुण रु. ८७,१५,९५९.२३ एवढी नुकसान भरपाई निश्चित करण्यात आली असून सदर नुकसान भरपाईची रक्कम ९२९ पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर बँकामार्फत जमा करण्यात आली आहे.

नैसर्गिक आपत्ती संदर्भात, बाधित शेतकऱ्यांना पिक विमा योजनेच्या मंडळनिहाय नुकसान भरपाईच्या ५०% प्रमाणे, पिक विमा योजना न घेतलेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याचा निर्णय दिनांक ९.१.२०१७ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथे झालेल्या पावसाने गंगेवरील आठवडे बाजाराचे झालेले नुकसान**

**(४२) ९०२७१ (१६-०८-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे दिनांक १४ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास झालेल्या पावसाने गंगेवरील आठवडी बाजाराचे मोठया प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार आठवडे बाजारात समावेश असलेल्या शेतकऱ्यांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०१-२०१८) :** (१) नाशिक येथे दिनांक १४ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास झालेल्या पावसाने गंगेवरील आठवडी बाजाराचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याचे आढळून आले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील देगलुर व बिलोली या तालुक्यातील पुरपूनर्वसित गावठाणामध्ये नागरीसुविधेची कामे करण्याबाबत**

**(४३) ९१३६१ (१५-०८-२०१७). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील देगलुर व बिलोली या तालुक्यातील पुरपूनर्वसित गावठाणामध्ये नागरीसुविधेची कामे करण्याबाबत लोकप्रतिनिधीनी दिनांक १७ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देगलुर व बिलोली या तालुक्यातील पुरपूनर्वसित गावठाणामध्ये नागरीसुविधेची कामे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर पुरपूनर्वसित गावात शासनाच्या प्रचलित नियमानुसार नागरी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(४४) ९१८२८ (१५-०८-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूरबाजार (जि.अमरावती) तालुक्यात माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.पालकमंत्री, अमरावती यांच्याकडे दिनांक ५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पंचनामे होवूनही नुकसान भरपाई देण्यात आलेली नसल्याने जिल्हाधिकारी, अमरावती यांनी तहसीलदार, चांदूरबाजार यांना दिनांक २२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास आदेश देवूनही अद्यापपर्यंत नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) माहे जून ते ऑक्टोबर २०१६ या कालावधीत राज्यातील जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी व पूरपरिस्थिती यामुळे शेतीपिके यांचे नुकसान झालेल्या नुकसानबाधीत शेतकऱ्यांना पिक नुकसानीवर मदत देण्याबाबतचा निर्णय, महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ०९ जानेवारी २०१७ अन्वये घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचोरा तालुक्यात फळबाग पिकांचे पंचनामे करुन शासनाच्या**
**फळबाग अनुदानात केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(४५) ९१९८१ (१५-०८-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.सुभाष तुकाराम पाटील व त्यांचे परिवारातील शेतकरी रा.लोहटार, (ता.पाचोरा) यांनी खोटे फळबाग पिकांचे पंचनामे करुन शासनाच्या फळबाग अनुदानात केलेल्या गैरव्यवहाराबाबत गुन्हे दाखल करण्याची मागणी मा. महसूल मंत्री, यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ६ जून, २०१७ रोजी च्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी उपविभागीय अधिकारी पाचोरा भाग पाचोरा यांनी दिलेल्या निर्देशानुसार तहसिलदार, पाचोरा, गटविकास अधिकारी, पाचोरा व तालुका कृषी अधिकारी पाचोरा यांची संयुक्त चौकशी नेमण्यात आली आहे. त्यानुसार उक्त नमूद चौकशी समितीने दिनांक १०.७.२०१७ रोजी चौकशी अहवाल उपविभागीय अधिकारी पाचोरा भाग पाचोरा यांच्या कार्यालयास सादर केलेला होता. परंतु अहवाल स्वंयस्पष्ट नसल्याने उपविभागीय अधिकारी पाचोरा भाग पाचोरा यांनी दि.२३.८.२०१७ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: चौकशी अंती कुणी दोषी आढळल्यास त्यांच्या विरुध्द योग्य ती कार्यवाही करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.
(३) प्रस्तुत प्रकरणी उपविभागीय अधिकारी, पाचोरा भाग पाचोरा यांना सदर प्रकरणी स्वत: व्यक्तीश: लक्ष घालून नियमानुसार उचित कार्यवाही करणेबाबत कळविले आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही पुर्ण होताच सविस्तर अहवाल सादर करण्याविषयी जिल्हाधिकारी,जळगांव यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### रायगड जिल्हमात अतिवृष्टीमुळे नद्यांना येणाऱ्या पुराबाबत

**(४६) ९२८३७ (१६-०८-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नदयांना येणाऱ्या पुरामुळे नदी काठच्या गावांना सावधानतेचा इशारा आपत्कालीन यंत्रणानी व पोलिसांनी दिला असल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुराचा धोका संभवणाऱ्या गावांना व जनावरांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याच्या सुचनाही दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त जिल्ह्यातील गावांना व जनावरांना सुरक्षित ठिकाणी हलविण्याबाबत तसेच सोईसुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०१-२०१८) :** (१) होय.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिवंडी व शहापूर (जि.ठाणे) या तालुक्यातील कालवे व धरणांकरिता संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देण्याबाबत**

**(४७) ९३२०१ (२१-०८-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील भिवंडी व शहापूर या तालुक्यातील कालवे व धरणांकरिता अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या असूनही या शेतकऱ्यांना प्रकल्पग्रस्तांचा दाखला मिळाला नसल्याचे नुकतचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार शेतकऱ्यांना प्रकल्पग्रस्तांचा दाखला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ नुसार पुर्वीच्या ठाणे जिल्ह्यातील २३७१ प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र वितरीत करण्यात आलेली आहेत. नवनिर्मित ठाणे जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांना आतापर्यंत एकूण ३९ प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र वितरीत करण्यात आलेली आहेत. माहे जानेवारी २०१७ ते २१/११/२०१७ पर्यंत प्राप्त अर्जापैकी २९ प्रकल्पग्रस्तांच्या अर्जातील त्रुटींची पुर्तता करण्याबाबत संबंधित तहसिलदार यांच्यामार्फत अर्जदारास कळविण्यात आलेले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे वडद (ता.औंढा-नागनाथ, जि.हिंगोली) येथील शेतकऱ्यांना सन २०१३-१४ मधील अतिवृष्टी अनुदानाचा लाभ देण्याबाबत**

**(४८) ९३६८० (१६-०८-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वडद (ता.औंढा-नागनाथ, जि.हिंगोली) येथील शेतकऱ्यांना सन २०१३-१४ मधील अतिवृष्टी अनुदानाचा लाभ देण्याबाबत उपविभागीय अधिकारी, वसमत यांच्यामार्फत दोषी असणाऱ्या तलाठी यांची चौकशी पूर्ण करण्यात आली असूनसुध्दा शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत अनुदान देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनुदान मिळणेसाठी शासनाने दिनांक २५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना पाठविलेल्या पत्रावर अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अनुदान शेतकऱ्यांना लवकरात लवकर देण्याबाबत तसेच पत्रावर कार्यवाही न करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) मौजे वडद (ता. औंढा-नागनाथ, जि. हिंगोली) येथील आपदग्रस्त शेतकऱ्यांना सन २०१३-१४ मधील अतिवृष्टी अनुदानाची रक्कम रुपये ९,३४,०००/- (अक्षरी रुपये नऊ लक्ष चौतीस हजार फक्त) इतका निधी महसूल व वन (म.वपु) विभाग शासन निर्णय क्र.एससीवाय-०९/२०१७ / प्र.क्र.२५/म-११ दिनांक २९.०९.२०१७ अन्वये विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे अर्थसंकल्पीय प्रणाली (BDS) वर वर्ग करण्यात आली आहे.

त्यास अनुसरुन विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दि.१६.१०.२०१७ रोजीच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी, हिंगोली रु.९,३४,०००/- इतका निधी यांना अर्थसंकल्पीय प्रणाली (BDS) वर उपलब्ध करुन दिला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील भातसा प्रकल्पासाठी जमीन देऊन विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन तसेच त्यांच्या मुलांना नोकरीत घेण्याबाबत

**(४९) ९४४६० (१६-०८-२०१७). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील १४ आदिवासी पाडयांमधील ४४४.७४ हेक्टर जमीन भातसा प्रकल्पासाठी बुडीत गेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भातसा प्रकल्पासाठी ज्या आदिवासींनी आपली जमीन देऊन विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांचे ४७ वर्षानंतरही अद्याप पुनर्वसन झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन आदिवासींना वंचित ठेवत असल्याच्या भावनेतून संपातलेल्या प्रकल्पग्रस्तांनी दिनांक ११ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास भातसा धरणावर आंदोलन करुन मुंबईचे पाणी केव्हाही बंद करण्याचा इशारा शासनाला तसेच स्थानिक कार्यालयाला दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने विस्थापितांचे पुनर्वसन तसेच त्यांच्या मुलांना नोकरीत घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०१-२०१८) :** (१) होय.
(२) नाही.
(३) होय.

(४) प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन भातसानगर वसाहतीमध्ये १५.३३ हे. क्षेत्रामध्ये केले असून, भातसा नगर वसाहतीत १८ नागरी सुविधापैकी १० सुविधा पुरविण्यात आल्या असुन,उर्वरीत सुविधा नव्याने पुरविण्यात येणार आहेत.सदर क्षेत्र भातसा प्रकल्पाच्या नांवे असल्याने ते महसूल व वन विभाग यांचेकडे हस्तांतरण करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याच्या अनुषंगाने भातसा प्रकल्पग्रस्ताच्या मागण्यांसंदर्भात झालेल्या बैठकीत ठरवल्यानुसार जिल्हाधिकारी ठाणे यांचेमार्फत कार्यवाही सुरु आहे.

प्रकल्पबाधित कुटुंबातील व्यक्तीपैकी ९६ प्रकल्पग्रस्तांना मंडळ कार्यालय,ठाणे याच्या अखत्यारित असणाऱ्या ५ विभागामध्ये त्यांच्या शैक्षणिक अहर्तेनुसार शासन सेवेत सामावून घेण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर शहरालगत महामार्गावरील गोकुळच्या शॉपीत (विक्री केंद्रे) झालेला गैरव्यवहार

**(५०) ९४९८९ (२४-१०-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरालगत महामार्गावरील गोकुळच्या शॉपीत (विक्री केंद्रे) गैरव्यवहार झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये निदर्शनास आल्यानंतर चार्टड अकाऊंट सुशांत फडणवीस व देसाई यांची चौकशी समिती नेमण्यात आली या समितीने चौकशी केली असता येथे लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे दिनांक ९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी गोकुळच्या संचालक मंडळाने शाहूपुरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१५-०१-२०१८) :** (१) होय, खरे आहे. गोकुळ दूध संघाकडून संबधितांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करणेत आलेली होती.संबंधित चौकशी अधिकाऱ्यांनी चौकशी केली असता तेथे लाखो रूपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे दिनांक ९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे.

(२) होय, खरे आहे. गोकुळ दूध संघाकडून शाहुपूरी पोलीस ठाण्यात प्रथम खबरी अहवाल (FIR) क्र. १९३८६०१८१७०३७१ कलम ४०६,४०८,४२०,४७७अ, ३४ आय.पी.सी .इ. अन्वये दि.१०.०९.२०१७ रोजी तक्रार दाखल केलेली आहे.

(३) व (४) होय, याबाबत विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध), पुणे यांनी दि.११.०९.२०१७ व दि.०४.१२.२०१७ अन्वये श्री.जी.व्ही. निकाळजे विशेष लेखा परीक्षक सहकारी संस्था वर्ग-१ (पदुम), कोल्हापुर यांना चौकशी करणेबाबत आदेशित केलेले आहे. त्यानुसार चौकशीचे कामकाज प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.